|| आजचा सुविचार ||

आयुष्य हे सायकल
चालवण्यासारखे आहे,
तोल सांभाळण्यासाठी
चालत राहणे आवश्यक आहे.

दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०६ | अंक : ४५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२८ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# प्रत्येक कुटुंबांला २५ किलो मोफत धान्य ते प्रतिहेक्टर १ लाख रुपये अनुदान द्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी राज्यातील दुष्काळ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवलं आहे. या पत्रात त्यांनी १७ मागण्या केल्या आहेत. शरद पवार यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेलं पत्र देखील शेअर केलं आहे. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर आणि ग्राम ीण नागरिकांना तातडीचा दिलासा मिळावा, यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांना पत्राद्वारे १७ मागण्या करत आहोत, असं शरद पवारांनी म्हटलं आहे.

शेती व शेती व्यवसायासाठी घेतलेली सहकारी, राष्ट्रीयीकृत, अर्बन बँका व पतसंस्थांची कर्जमाफी, जमीन महसूल व कृषी वीजबिल माफी, प्रतिकुटुंब २५ किलो मोफत धान्य, थेट आर्थिक मदत, शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर १ लाख रुपये आणि शेतमजुरांना २५ हजार रुपये अनुदान, तहसीलदारांना टँकर मंजुरीचे अधिकार देऊन पिण्याचे व जनावरांचे पाण्याची तातडीने उपलब्धता, रोजगार हम ीची कामे, जलसंधारणासाठी विशेष निधी, विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी, वसतिगृह फी आणि मेस फी माफी तसेच फळबाग व पिकांच्या नुकसानीची भरपाईची मागणी महाराष्ट्र शासनाकडे केली आहे, अशी माहिती शरद पवारांनी दिली.

दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी विधिमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावून, दसरा-दिवाळीपूर्वी शेतकरी व शेतमजुरांना मदत देण्यात यावी, अशीही मागणी ह्या पत्राद्वारे करीत आहे, असं शरद पवारांनी सांगितलं.

दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकरी, शेतम जूर आणि ग्रामीण नागरिकांना तातडीने दिलासा मिळणं आवश्यक आहे. त्यांच्या अडचणींचा गांभीर्याने विचार करून या मागण्यांची शासनाने तातडीने अंमलबजावणी करावी, ही विनंती, अशी भूमिका शरद पवारांनी मांडली आहे.



**शरद पवारांनी केलेल्या १७ मोठ्या मागण्या...**

- राज्यातील वंचित राहिलेले तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात यावेत.
- संपूर्ण जमीन महसूल माफ करावे.
- कर्जमाफी झालेल्या तारखेनंतर आजतागायत ज्या शेतकऱ्यांनी शेती व शेती व्यवसायाशी निगडीत घेतलेल्या सहकारी बँक, राष्ट्रीयकृत बँक, सहकारी अर्बन बँका आणि पतसंस्था तसेच सामाजिक न्याय, अल्पसंख्याक, आदिवासी विभागाचे वैयक्तिक कर्ज, तसेच फळबागांसाठी घेतलेले कर्ज आणि महिला बचत गटांनी घेतलेल्या कर्जाची रक्कम पूर्णपणे माफ करण्यात यावी.
- शेतकऱ्यांच्या कृषीपंपांची सर्व वीज बिले माफ करण्यात यावीत.
- दुष्ताळग्रस्त भागातील शालेय व म हाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच वसतीगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांची वसतिगृह फी आणि मेस फी पूर्णपणे माफ करण्यात यावी.
- रोजगार हमी योजनेतील सध्याचे निकष शिथिल करुन, मागेल त्या ठिकाणी तीन किलोमीटरच्या परिसरात तातडीने रोजगाराची कामे सुरु करण्यात यावीत.
- पिण्याच्या पाण्यासाठी तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी टँकर मंजूर करण्याचे अधिकार तहसीलदारांना देवून त्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी.
- टंचाईग्रस्त म्हणून जाहीर केलेल्या गावांतील शेतकऱ्यांच्या कृषीपंपांची वीज खंडीत करु नये. तसेच दुष्काळग्रस्त भागात कोणत्याही प्रकारचे लोडशेडिंग करण्यात येऊ नये.
- शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबाना प्रतिकुटुंब २५ किलो धान्य सरसकट मोफत देण्यात यावे.
- दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकरी व शेतमजूरांकडील पशूधनासाठी थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये अनुदान जमा करण्यात यावे.
- जलसंधारण कामे सुरु करण्यासाठी सध्याचे निकष शिथिल करुन विशेष निधी उपलब्ध करुन ही कामे तातडीने सुरु करण्यात यावीत.
- महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती तीव्रता लक्षात घेता, शेतकऱ्यांना प्रती हेक्टर एक लाख आणि शेतमजुरांना २५ हजार रुपये अनुदान तातडीने त्यांच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात यावे.
- दुष्काळामुळे फळबागा, केळी, ऊस, आणि धान यांचे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी.
- ज्या शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात फळबागांची लागवड केलेली आहे, अशा शेतकऱ्यांना शासनाद्वारे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत तातडीने आदेश निर्गमित करण्यात यावे.
- शेतकरी अथवा शेतमजूर यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत प्रलंबित असलेली थकीत देयेके व त्यांच्यावरील अनुदान तातडीने वर्ग करण्यात यावे.
- दुष्काळ निवारण्यासाठी आवश्यक असलेला संपूर्ण निधी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने वर्ग करण्यात यावा.
- दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, म हाराष्ट्राच्या विधीमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावून दुष्काळ परिस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात यावी व आवश्यक उपाययोजनांबाबत निर्णय घेण्यात यावेत. तसेच या अधिवेशनात झालेल्या निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करुन, नुकसानग्रस्त शेतकरी व शेतमजुरांना दसरा व दिवाळीपूर्वी आवश्यक आर्थिक मदत त्यांच्या बँक खात्यांमध्ये वितरीत करण्यात यावी.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील चौदाही तालुक्यांचा दुष्काळाच्या यादीत समावेश

## नगरच्या शेतकऱ्यांना घोषणांपेक्षा प्रत्यक्ष मदतीची प्रतीक्षा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहिल्यानगर :** राज्यातील खरीप हंगाम २०२६ मध्ये टीगर-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये शासनाने दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत, जामखेड,नगर,पारनेर, श्रीगोंदा, पाथर्डी, शेवगाव, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव आणि श्रीरामपूर या चौदाही तालुक्यांचा समावेश आहे.




पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्याने जिल्ह्यातील खरीप हंगाम संकटात सापडला आहे. सुरुवातीच्या पावसानंतर दीर्घकाळ पाऊस न झाल्याने सोयाबीन, तूर, उडीद, मूग, मका, बाजरी,कापूस यासह विविध पिकांवर परिणाम झाला आहे. अनेक भागांत पिके वाढीच्या महत्त्वाच्या अवस्थेत असतानाच पावसाअभावी कोमेजली आहेत. त्याम ुळे उत्पादन घटण्याची शक्यता असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.

दुष्काळ जाहीर झाल्याने संबंधित तालुक्यांमध्ये जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कृषी पंपांच्या वीजबिलात सवलत, रोजगार हमीच्या कामांच्या निकषात शिथिलता, आवश्यकतेनुसार टँकरने पाणीपुरवठा, चारा व अन्नधान्याची व्यवस्था अशा उपाययोजनांचा मार्ग मोकळा झाला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना पंचनाम्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आता जिल्ह्यातील सर्व चौदा तालुके दुष्काळाच्या कक्षेत आल्याने शेतकरी, पशुपालक आणि शेतमजुरांचे लक्ष प्रत्यक्ष मदतीकडे लागले आहे.

विशेषतः खरीप पिकांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून पंचनामे, नुकसानग्रस्त क्षेत्राचे मूल्यांकन आणि पात्र लाभार्थ्यांना मदत देण्याची प्रक्रिया जलदगतीने राबविण्याची मागणी होत आहे.

**शेतकऱ्यांना मिळणारे प्रमुख फायदे व सवलती...**

पीक कर्जाचे पुनर्गठन, जमीन महसूलात सूट, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू वीज बिलात सूट, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क माफ, रोजगार हमी योजनेअंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करणे, आवश्यक तेथे पाणीपुरवठा करण्यासाठी टँकरची व्यवस्था, टंचाई जाहीर झालेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडित न करणे,शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी,मजूर इत्यादींना अन्नधान्याची टंचाई भासणार नाही यासाठी व्यवस्था उभी करणे, जनावरांसाठी आवश्यक चार उपलब्ध करून देणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे तसेच यापूर्वी निर्गमित करण्यात आल्याप्रमाणे उपलब्ध पाणी पिण्यासाठी तसेच जनावरांसाठी राखून ठेवणे.

# अत्यंत भीषण अपघात! सीबीडी बेलापूर हायवेवर तीन रिक्षा व इर्टिगा गाडीला एसटी बसची जोरदार धडक



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, बेलापूर (नवी मुंबई) :** सीबीडी बेलापूर हायवेवर आज सायंकाळी भीषण आपघात घडल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत तीन रिक्षा व इर्टिगा गाडीला एसटी बसने जोरदार धडक दिल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून या अपघातात सुदैवानी कुठलीही जीवितहानी झाली नाही. दोन प्रवाशांना जबर मार लागला असून सात जण जखमी झाले आहेत.

या प्रसंगी पोलिस लाईनचा राजा मित्र मडळ सेक्टर-१ प्रशांत तडाखे व सीबीडी चा राजा साई एकता मित्र मडळ सेक्टर -२ यावेळेस घटनास्थळी

मदतीस आले सर्व प्रवाशाना एमजीएम हॉस्पीटल सीबीडी बेलापूर येथे हलविण्यात आले. पुढील तपास पोलीस करत आहे.

# डहाणू-तलासरीत आमदार मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद; १,५०० स्पर्धकांचा सहभाग

## ग्रामीण, आदिवासी भागातील युवा खेळाडूंना मिळाले व्यासपीठ; विविध वयोगटांत स्पर्धा

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२७, तलासरी (पालघर) :** डहाणू-तलासरी तालुका कला क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने, ट्रायबल चॅरिटेबल ट्रस्ट, डहाणू यांच्या आयोजनातून आणि डहाणू विधानसभा आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या नेतृत्वाखाली भव्य आमदार मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला युवक, युवती आणि बालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल १,५०० स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला.

ग्रामीण व आदिवासी भागातील युवकांमधील क्रीडागुणांना चालना मि ळावी, त्यांना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच आरोग्य व व्यायामाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विविध वयोगटांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले होते. खुल्या गटातील



मुले व मुलींसाठी ५ किलोमीटर, १७ वर्षांखालील मुला-मुलींसाठी ३ किलोम ीटर, तर १४ वर्षांखालील मुला-मुलींसाठी २ किलोमीटर अंतराची स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धकांनी मोठ्या उत्साहात धाव घेत सहभाग नोंदविला.

मॅरेथॉनच्या आयोजनासाठी विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रीडाप्रेमी आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. स्पर्धा सुरळीत पार पडण्यासाठी पोलिस प्रशासनाचेही सहकार्य लाभले.

यावेळी तलासरी पोलिस निरीक्षक अजय गोरड, नंदकुमार हाडळ, सुरेश भोये, सुभाष दुमाडा, सुहास सुरती, विलास ठाकरे, मलावकर यांच्यासह विविध म ान्यवर, आयोजक, विकी कुवरा सर, क्रीडा क्षेत्रातील व्यक्ती आणि नागरिक उपस्थित होते.

डहाणू-तलासरी परिसरातील युवकांम ध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी तसेच ग्रामीण व आदिवासी भागातील होतकरू खेळाडूंना संधी मिळण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन सातत्याने व्हावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

## खापरखेडा-दहेगाव रंगारी सब्बलनाला परिसरातील घटना

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२७, नागपूर :** खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील खापरखेडा-दहेगाव(रंगारी) मार्गावरील सब्बल नाला परिसरात २६ सप्टेंबर शनिवारला रात्री ९.०० वाजताच्या सुमारास एका दुचाकी व अज्ञात वाहनाचा अपघातात एका इसमाचा घटनास्थळी मृत्यू झाला असून एकच खळबळ उडाली आहे.




प्राप्त माहिती नुसार मृतकाचे नाव ईश्वर कुकडकर (५५) पाटणसावंगी असे मृतकाचे नाव असून मृतक ईश्वर कुकडकर हे खाजगी सिंग सेक्युरिटी सर्व्हिसेस कोराडी येथे कार्यरत होते.

रात्रीच्या सुमारास मृतक ईश्वर कुकडकर दुचाकी क्रमांक एमएच -३१-डीएन-३५४० घेऊन कर्तव्यावर निघाले असताना दहेगाव रंगारी सब्बल नाला परिसरात एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. सदर घटनेत ईश्वर कुकुडकर यांचा घटनास्थळी मृत्यू झाला असून त्यांना एक मुलगा व एक मुलगी असल्याची माहिती मिळाली आहे.

खापरखेडा पोलीसांना घटनेची माहिती मिळताच घटनास्थळ गाठून पंचनामा केला मृतकाचे पार्थिव शवविच्छेदन करण्याकरिता हलविण्यात आले असून पुढील तपास खापरखेडा पोलीस करीत आहे.




## वेगवान कासव आणि सैरभैर ससे

पिढ्यान् पिढ्या सांगत येत असलेली कासव आणि ससा यांच्या शर्यतची गोष्ट वेगवान जगात कुणाच्या फारशी पचनी पडत नाही. व्यवस्थापन कौशल्यातील नवे गुरू आणि त्यांचे शिष्य कान वाकडे करूनच ती ऐकतात. सगळ्यांना सशांसारखं भरभर धावायचं आहे. सत्तेचं, श्रीमंतीचं, पदांचं, संपन्नतेचं लुसलुशीत गवत खायचं आहे आणि झोपून जायचं आहे. कासवासारखा संयम आता कुणी दाखवावा! सत्ताकारण आणि राजकारणात तर ते दुर्मीळच. जे हवं ते दोन मिनिटांत तयार मिळावं, हा मॅगी-नूडल्सचा ट्रेंड तिथे रुजू बघतो आहे. प्रसिद्धीचा हव्यास, रील्सचे कल्चर, मायावी फॉलोअर्सचा पाठिंबा देणाऱ्या अंगठ्यांचं बळ मोठं होऊ बघत आहे. ते प्राप्त करण्यासाठीची धडपड सुरू आहे. त्यासाठी बेताल वक्तव्यांचा आधार, चुकीच्या कृतींचं समर्थन सर्रास केलं जात आहे. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षांचे धुमारे वेगळ्याच उंचीकडे झेपावत असल्याने त्यात पक्ष, त्यांची ध्येये, शिस्त यांची चिंता अभावानंच दिसते. नवोदितांमध्ये तर ती आहेच, पण जुनीजाणती मंडळीही हळूहळू त्याच दिशेने सरकत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कासवाची प्रेरणा सांगणं अनेकांना आश्चर्यात टाकणारं. त्याचा अन्वयार्थ कुणाला आत्ममंथनाकडे वळायला लावणारा, कुणाला धडा शिकविणारा, तर कुणाला इशारा देणाराही आहे.

उद्योजकांशी बोलताना मुख्यमंत्री बोलले त्याचा मथितार्थ असा होता की, 'बोलणारे काही तरी बोलून जातात, काही वेळा हेडलाइन घेतात; मात्र काम करणाऱ्यांची कामं पिढ्यान् पिढ्या लक्षात राहतात. मला जेव्हा एखादं काम करायचं असतं. त्याची योग्यता पटते तेव्हा माझ्यावर कुणी कितीही टीका करू दे, माझा निर्णय झाला की मी त्या दिशेनं हळूहळू पुढे जातो. याबाबतीत माझी प्रेरणा कासव आहे. कासवाला कुणी दगड मारला की तो जसा शेलमध्ये जातो, दगड पाठीवर पडत राहतात. त्याला काहीच लागत नाही. आपल्यावर जेव्हा टोकाची टीका होते, तेव्हा कासवासारखं शेलमध्ये जायचं. टीका संपली की काम करायचं. हळूहळू चालत जायचे, कधी न कधी मंझील मिळतेच.'

त्यांचं ऐकलं तर अनेक प्रश्न सुटतील. नागपुरात डीजेवर बंदीचा निर्णय पोलिसांनी घेतला. त्याच्या विरोधात विरोधीपक्षाचा कुठलाही नगरसेवक अथवा नेता पुढे आला नाही. विरोधक भाजपचेच नेते होते. भाजपचे माजी आमदार संदीप जोशी बंदीच्या बाजूने होते. 'हिंदूंच्याच सणांना बंदी का' असा सवाल करीत आमदार प्रवीण दटके विरोध करीत होते. निर्धारित मर्यादेत डीजे वाजवा असा मध्यममार्ग शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी काढला. हे परस्पर विरोधी आवाज त्यांच्या समर्थकांनी इतके मोठे केले की, त्यावरून पक्षाच्या कोअर कमिटीतही त्यावरून तणाव झाला. कुणी त्यावरून बाजूला हटायला तयार नव्हते. काही काळासाठी का होईना कुणालाही कासव होऊन टीका संपेपर्यंत शेलमध्ये जाण्याची इच्छा झाली नाही.

बुलढाण्याचे शिवसेना आमदार संजय गायकवाड आणि चिखलीच्या भाजप आमदार श्वेता महाले यांच्यातील शीतयुद्ध आता समोरासमोरच्या लढाईत परावर्तित झाले आहे. बुलढाण्याच्या आमदारांनी आपल्या मुलाचा वाढदिवस चिखलीत साजरा केला. त्याच्यापेक्षा मोठा सोहळा चिखलीच्या आमदारांनी आपल्या यजमानांच्या वाढदिवसानिमित्त बुलढाण्यात आयोजिला. 'बाप तो बाप होता है' असे इशारे दिले गेले. त्यावरूनही वादळ उठलं. अमरावतीत भाजपचे खासदार अनिल बोंडे आणि माजी खासदार नवनीत राणा यांच्यातही असाच वाद उफाळला आहे. नागपूर महापालिकेतील विविध समित्यांच्या काही सभापतींचे काम 'दृष्ट' लागावी असं सुरू आहे. कुणाचे कुणावर नियंत्रण नाही. सत्तापक्ष नेता नावाची नियंत्रण व्यवस्था असते, महापौरांचे निर्देश ऐकायचे असतात हे त्यांच्या गावीही दिसत नाही. प्रत्येकाला पुढे जायची घाई, ही घाई कासवाची गोष्ट कशी समजून घेणार? काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय वसंत साठे यांच्या जन्मशताब्दी निमित्त काढलेल्या वसंतस्मृती विशेषांकाच्या प्रकाशनप्रसंगी नितीन गडकरींनी काढलेले चिमटे झोंबणारे आहेत. ते म्हणतात, 'जो येतो तो सत्ताधारी पक्षात घुसतो. तो का आला ते कळत नाही आणि का गेला तेही कळत नाही. कार्यकर्ते आता विचाराचे किंवा पक्षाचे नव्हे तर सत्ताधारी पक्षांचे अनुयायी होत आहेत. भाजपमध्ये गर्दी झाली तरीही लोक येतच आहेत. जुने विचारतात आम्ही कुठे जायचं? आम्ही सांगतो, बाहेर जा.' हा त्यांचा टोला मिश्कील, तरी अंतर्मुख करणारा आहे. वेगवान सश्यांचे कान टोचणारा आहे.

**– अतुल पांडे**

# दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या लतादीदी

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला म ोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांची आज जयंती. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ



लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्म ीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रम ुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वो च्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम. एस. सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर आज हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या म ाध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# मतदारयादीवर संशयाची सावली : ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीपासून निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेपर्यंत!

लोकशाहीची खरी ताकद संसदेत नाही, सत्तेच्या खुर्चीत नाही, तर मतदाराच्या बोटावर उमटणाऱ्या एका शाईच्या ठशात असते. त्या मताची नोंद करणारी मतदारयादीच संशयाच्या भोवऱ्यात सापडली, तर प्रश्न केवळ एका निवडणुकीचा राहत नाही, तर तो लोकशाहीवरील विश्वासाचा बनतो. सध्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि स्पेशल इंटेंसिव रिव्हिजन (SIR) या प्रक्रियेभोवती निर्माण झालेला वाद त्यामुळेच गंभीर आहे. मात्र या वादात आरोप आणि



सिद्ध तथ्य यांची सरमिसळ होऊ नये. ज्ञानेश कुमार यांनी निवडणूक आयोगाच्या पदाचा गैरवापर करून कोणत्याही सरकारला चुकीच्या पद्धतीने निवडून दिले, हे सध्या सिद्ध झालेले तथ्य नाही. विरोधकांनी गंभीर आरोप केले आहेत; त्याचवेळी निवडणूक आयोगाने सर्व अंतिम निर्णय सर्वानुमते घेतल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता राजकीय घोषणांपेक्षा स्वतंत्र, पारदर्शक आणि विश्वासार्ह तपासणी महत्त्वाची ठरते.

भारतीय निवडणूक आयोगातील दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी मागील दहा महिन्यांत मतदार नोंदणी, नाव वगळणे, पुनर्स्थापना आणि मतदारयादी व्यवस्थापनाशी संबंधित निर्णयांवर किमान १४ वेळा आक्षेप नोंदवल्याचे इंडियन एक्सप्रेस च्या वृत्तात नमूद झाले आहे. यामुळे आयोगाच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेबाबत प्रश्न निर्माण झाले. या वृत्तानंतर राजकीय वाद अधिक तीव्र झाला. मात्र आयोगाने त्यावर स्पष्ट भूमिका मांडत सांगितले की, अंतर्गत नोंदी, सूचना किंवा वेगवेगळी मते ही संस्थात्मक प्रक्रियेचा भाग आहेत आणि (SIR) सह अंतिम निर्णय सर्व तीन आयुक्तांच्या संमतीने घेण्यात आले आहेत. याच दोन भूमिकांमधील फरकाची वस्तुनिष्ठ चौकशी होणे आवश्यक आहे. कारण निवडणूक आयोग हा कोणत्याही पक्षाचा नव्हे, तर संविधानाचा आयोग आहे.

२५ सप्टेंबरला काँग्रेसने देशातील अनेक राज्यांमध्ये ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन केले. दिल्लीतील जंतर-मंतर परिसरातही आंदोलन झाले. दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, विविध ठिकाणी सुमारे १५० राजकीय कार्यकर्ते, विद्यार्थी नेते आणि नागरी समाजातील व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले, त्यांना नंतर सोडण्यात आले. काही ठिकाणी पोलिसांनी पाण्याचा फवारा वापरला, तर काही आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले. त्यामुळे आता प्रश्न केवळ (SIR) चा नाही, लोकांना आपले प्रश्न शांततामय पद्धतीने मांडण्याचा अधिकार आणि प्रशासनाने आंदोलन हाताळण्याची पद्धत हाही लोकशाही चर्चेचा विषय बनला आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २४ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेत ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. त्यांनी निवडणूक प्रक्रियेबाबत गंभीर आरोप करत व्होट चोरी आणि संस्थात्मक विश्वासार्हतेचा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी आयोगातील कथित मतभेदांचा संदर्भ देत निवडणूक प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले. काँग्रेसने त्यानंतर देशभर आंदोलनाची भूमिका घेतली. २५ सप्टेंबरला दिल्लीसह अनेक राज्यांमध्ये निदर्शने झाली. मात्र राहुल गांधी किंवा कोणत्याही राजकीय पक्षाने केलेला आरोप हा स्वतःहून न्यायालयीन निष्कर्ष होत नाही. मतचोरी झाली हा राजकीय आरोप आणि मतदारयादीतील गैरप्रकार सिद्ध झाला हा कायदेशीर निष्कर्ष या दोन्हींमध्ये मूलभूत फरक आहे. तो फरक जपणे हीच जबाबदार सार्वजनिक चर्चेची कसोटी आहे.

त्याचप्रमाणे या वादात कॉकरोच जनता पार्टी आणि तिचे संस्थापक अभिजीत दीपके यांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे. दीपके यांनी ४८ तासांत ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, SIR थांबवावी आणि मतदारयादीच्या प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करावी, अशा मागण्या केल्या आहेत. त्यांनी राजीनामा न झाल्यास देशव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे. सीजेपीने निवडणूक आयोगाच्या केंद्रीय तंत्रज्ञान प्रणालीद्वारे मतदारयादीशी संबंधित निर्णय कसे घेतले जातात, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही केली आहे. दीपके यांची भूमिका काँग्रेसपेक्षा वेगळी असली, तरी दोन्हींकडून निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा प्रश्न उपस्थित होत आहे. या सर्व मागण्यांकडे पक्षीय चष्म्यातून नव्हे, तर मतदाराच्या



**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**

हक्काच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

मुख्य निवडणूक आयुक्तांना हटविण्याची प्रक्रिया साधी राजकीय मागणी पूर्ण करण्याइतकी सोपी नाही. संविधानाच्या कलम ३२४(५)नुसार CEC यांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणेच पद्धतीने आणि त्याच आधारांवर पदावरून हटवता येते. म्हणूनच या संपूर्ण प्रकरणात काही ठोस पावले आवश्यक आहेत.

**पहिले :** SIR शी संबंधित सर्व निर्णय, अंतर्गत नोंदी आणि आक्षेप सार्वजनिक तपासणीसाठी उपलब्ध करावेत.

**दुसरे :** मतदारांची नावे वगळताना कोणते निकष वापरले गेले, किती नावे वगळली आणि त्यापैकी किती नावे अपीलनंतर पुन्हा जोडली गेली, याचा राज्यनिहाय पारदर्शक डेटा प्रसिद्ध करावा.

**तिसरे :** आयोगातील दोन आयुक्तांनी नोंदविलेल्या कथित १४ आक्षेपांची स्वतंत्र घटनात्मक/न्यायिक पातळीवर पडताळणी व्हावी.

**चौथे :** ज्या मतदाराचे नाव वगळले जाते, त्याला प्रभावी नोटीस, पुरेसा वेळ आणि सहज उपलब्ध अपील व्यवस्था मिळाली पाहिजे.

**पाचवे :** निवडणूक आयोगाच्या डिजिटल प्रणालीचे स्वतंत्र तांत्रिक ऑडिट झाले पाहिजे.

**सहावे :** भविष्यात CEC आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेबाबत व्यापक संसदीय व सार्वजनिक चर्चा व्हावी.

लोकशाहीमध्ये निवडणूक आयोगावर सरकारइतकाच नव्हे, तर सत्ताधारी आणि विरोधक दोघांनाही विश्वास ठेवता आला पाहिजे. कारण आज सत्तेत असलेला पक्ष उद्या विरोधात असू शकतो आणि आज विरोधात असलेला पक्ष उद्या सत्तेत येऊ शकतो. त्यामुळे आयोगावरील विश्वास हा कोणत्याही एका पक्षाच्या विजय-पराजयाशी जोडता कामा नये. डखठ योग्य आहे की अयोग्य, ज्ञानेश कुमार यांनी नियमांचा गैरवापर केला की नाही, आयोगातील मतभेदांचे स्वरूप नेमके काय होते. या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दस्तऐवज, कायदा, आकडेवारी आणि स्वतंत्र चौकशी यावर आधारित असले पाहिजे. कारण मतदाराच्या नावाची किंमत कोणत्याही पक्षाच्या राजकीय घोषणेपेक्षा मोठी आहे.

आज देशासमोर प्रश्न फक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा का? एवढाच नाही. त्यापेक्षा मोठा प्रश्न आहे. मतदाराला आपल्या मतदारयादीतील नाव सुरक्षित असल्याचा विश्वास आहे का? नाव वगळले गेले तर न्याय मिळण्याची खात्री आहे का? निवडणूक आयोगातील प्रत्येक निर्णय पारदर्शकपणे तपासता येतो का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सत्ताधारी आणि विरोधक या दोघांपासून समान अंतर राखणारी संस्थात्म क विश्वासार्हता आपण जपणार आहोत का? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली तरच सध्याचा आक्रोश रचनात्मक लोकशाही प्रक्रियेत रूपांतरित होईल. राजीनामा मागणे हा राजकीय अधिकार आहे; आंदोलन करणे हा लोकशाही अधिकार आहे, आरोपांची चौकशी मागणेही नागरिकांचा अधिकार आहे. पण दोष सिद्ध होण्यापूर्वी दोषी ठरवणे आणि चौकशीपूर्वी निर्दोष घोषित करणे, दोन्ही लोकशाहीसाठी धोकादायक आहेत.

आज गरज आहे ती एका व्यक्तीच्या भवितव्यापेक्षा निवडणूक प्रक्रियेच्या भवितव्याची. म तदारयादीतून एक नाव चुकीने वगळले गेले, तरी एका नागरिकाचा मतदानाचा अधिकार धोक्यात येतो. आणि जर संपूर्ण प्रक्रियेवरच संशय निर्माण झाला, तर प्रश्न एका मतदाराचा राहत नाही, तो संपूर्ण लोकशाही व्यवस्थेच्या विश्वासाचा बनतो. म्हणून आता घोषणांपेक्षा पारदर्शकता, आरोपांपेक्षा पुरावे आणि राजकीय संघर्षापेक्षा घटनात्मक उत्तरदायित्व यांची गरज आहे. निवडणूक आयोगाची प्रतिष्ठा कोणत्याही व्यक्तीपेक्षा मोठी आहे आणि म तदाराचा विश्वास कोणत्याही सत्तेपेक्षा मोठा. लोकशाही जिंकायची असेल तर प्रथम मतदाराचा विश्वास जिंकावा लागेल.

### पारवा

मनमोहवून टाकतो
थव्यात फिरे पारवा
गिर्रेबाज सान पक्षी
ऐटडोळ्यात मिरवा

दाणेटाकून चटपटी
मैफिलत्यांची भरवा
तुडूंबभरले पोटजरी
खाद्य पुनश्च रे भरवा

भूतदया प्रदर्शन करे
चित्तास लाभे गारवा
पाहण्यात दंग सगळे
स्वताला संपूर्णहरवा

सोयी सुविधा निर्मून
रे कबुतरांना बोलवा
आरोग्यघातक म्हणे
आता दूरवर घालवा

ठेवावे का हाकलावे
आधी काय ते ठरवा
धरसोडवृत्ती कसली
नंतर लावावा वरवा

रे विषयगहन चर्चेचा
तारतम्य जरासे ठेवा
अनाठायी हट्टापायी
घालवाल मोल ठेवा

मानव असो वा पक्षी
नियमसारखा रे सर्वा
माणूस बनून दाखवा
नंतर मोठेपण मिरवा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# जिल्ह्यातील १२ साखर कारखानदारांनी थकवले जिल्हा बँकेचे २ हजार ७०० कोटींचे कर्ज



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहिल्यानगर :** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सहकारी साखर कारखाने आहेत. हे साखर कारखाने बिगर शेती मतदारसंघात मोडतात. जिल्ह्यातील सहकारी कारखान्यांनी बँकेकडून जवळपास २ हजार ७०० कोटींचे कर्ज आहे. हे कर्ज कारखान्यांनी गेल्या वर्षीचा गाळप हंगाम सुरू करताना घेतलेले आहे. या कर्जाची कारखान्यांकडून अद्याप परतफेड झालेली नाही. जिल्ह्यातील सुमारे १२ हून अधिक सहकारी साखर कारखान्यांची ही थकबाकी आहे. त्यामुळे कारखानदारांनी आपल्या नावे ठराव न करता विकास सोसायट्यांच्या माध्यमातून निवडणुकीस उतरण्याचा मार्ग शोधला आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी थकबाकीची प्रमुख अट आहे. बँकेचे ९० दिवसांपेक्षा अधिक काळ कर्ज थकविलेले असल्यास संबंधित सहकारी संस्थेचा ठराव रद्द करण्याची तरतूद आहे. कारखान्यांकडे ९० दिवसांपेक्षा अधिक काळ कर्ज थकलेले आहे. त्यामुळे बहुतांश सर्वच सहकारी साखर कारखान्यांच्या संचालकांनी कायद्याच्या कचाट्यातून पळवाट काढली. आपल्या तालुक्यातील विकास सोसायटीतून ठराव पाठविले आहेत. हे ठराव जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून मंजूर झाले असून, कारखान्यांच्या संचालकांचा अंतिम मतदार यादीत समावेश आहे. कोणतीही स्थानिक स्वराज्य व सहकारी संस्थेची निवडणूक लढविताना थकबाकी भरून ना हरकत प्रमाणपत्र दाखल करावे लागते. त्यानंतरच निवडणूक लढविण्यास परवानगी मिळते. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मात्र असा कोणताही निकष नाही. बँकेची निवडणूक लढविणारा उमेदवार ज्या कारखान्याचा पदाधिकारी आहे, त्या कारखान्याकडे थकबाकी आहे का, हा मुद्दा उपस्थित केल्यास अनेक संचालक अपात्र ठरू शकतात. मात्र, तसे होण्याची शक्यता कमीच आहे.

# अपर तहसील कार्यालयासाठी दीड एकर जमीन दानाचा संकल्प

## शेतकरी अब्दुल खालेक अब्दुल रज्जाक यांच्या दिलदार निर्णयाने चारठाण्याच्या विकासाला नवी दिशा

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.२७, जिंतूर (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील चारठाणा हे स्वातंत्र्यसैनिकांचे गाव म्हणून ओळखले जाते. राज्य शासनाने नुकतेच चारठाणा येथे अपर तहसील कार्यालय मंजूर केल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कार्यालयासाठी जागेचा प्रश्न निर्माण झालेला असताना चारठाणा येथील सधन शेतकरी अब्दुल खालेक अब्दुल रज्जाक यांनी आपली दीड एकर जमीन शासनाला दानपत्र करून देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यांच्या या निर्णयाचे ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील नागरिकांकडून कौतुक होत आहे. चारठाणा टी-पॉइंटवर नांदेड - छत्रपती संभाजीनगर महामार्गालगत असलेल्या गट क्रमांक ४६२ मधील दीड एकर जमीन अपर तहसील कार्यालयासाठी देण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला आहे. लाखो रुपयांची बाजारमूल्य असलेली जमीन गावाच्या विकासासाठी



शासनाला देण्याची तयारी दाखवून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.

अपर तहसील कार्यालयामुळे चारठाण्यासह परिसरातील अनेक गावांतील नागरिकांची महसूल विभागाशी संबंधित कामांसाठी होणारी धावपळ कमी होणार आहे. त्यामुळे कार्यालयासाठी कायमस्वरूपी व प्रशस्त जागा उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. अशा परिस्थितीत अब्दुल खालेक अब्दुल रज्जाक यांनी जमीन देण्याची तयारी दर्शविल्याने जागेचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे. राज्य शासनाकडून अपर तहसील कार्यालयाच्या कार्यान्वयनासाठी हालचाली सुरू असून, तात्पुरत्या स्वरूपात हुतात्मा स्मारक येथे कार्यालय सुरू करण्याचा विचार असल्याचे समजते. त्यानंतर महामार्गालगतच्या मोक्याच्या जागेवर प्रशस्त व सुसज्ज इमारत उभारण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.

चारठाण्याच्या प्रवेशद्वारावर असलेल्या टी-पॉइंटवरील जागा कार्यालयासाठी उपलब्ध झाल्यास नागरिकांना ये-जा करण्यासाठी ही सोयीचे ठरणार आहे. महामार्गालगत शासकीय कार्यालय उभारल्यामुळे भविष्यात या परिसरातील विकासाला ही चालना मिळण्याची शक्यता आहे. गावाच्या विकासासाठी स्वतःची जमीन देण्याचा निर्णय हा केवळ दानाचा विषय नसून चारठाण्याच्या भविष्यासाठी केलेली मोठी सामाजिक गुंतवणूक असल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. त्यांच्या या निर्णयामुळे इतर नागरिकांनाही गावाच्या विकासासाठी पुढाकार घेण्याची प्रेरणा मिळणार आहे. अपर तहसील कार्यालयामुळे चारठाणा हे परिसरातील महत्त्वाचे प्रशासकीय केंद्र म्हणून विकसित होण्यास मदत होणार असून, कार्यालयाची कायमस्वरूपी इमारत उभारल्यास त्यात आणखी भर पडणार आहे. त्यामुळे अब्दुल खालेक अब्दुल रज्जाक यांच्या दिलदार निर्णयाने चारठाण्याच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली जाणार असल्याची चर्चा पंचक्रोशीत सुरू आहे.गावाच्या विकासासाठी जमीन देण्याच्या त्यांच्या निर्णयाचे चारठाणा ग्रामस्थ, व्यापारी, शेतकरी तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी स्वागत केले असून, गावाच्या प्रगतीसाठी अशी सामाजिक भावना आणि योगदान निश्चितच प्रेरणादायी आहे, अशा प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहेत.

# श्री ढोकेश्वर विद्यालयात माता पालक मेळावा उत्साहात संपन्न

## मातांनी मुलांशी मैत्रीचे नाते ठेवावे - प्राचार्य बाळासाहेब खिलारी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी माता पालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांच्या अध्यक्षतेखाली हा मेळावा पार पडला.

यावेळी प्राचार्य खिलारी यांनी मातांना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्पर्धेच्या युगात मुलांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे अत्यंत गरजेचे आहे. पालकांनी केवळ पालक म्हणून न राहता मुलांशी मैत्रीचे नाते निर्माण करावे, जेणेकरून मुले मनातील गोष्ट मोकळेपणाने सांगतील. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद असावा. तसेच पाल्यांना मोबाईलच्या अतिवापरापासून व जंक फूडपासून दूर ठेवून पौष्टिक व सकस आहार द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, समन्वयक अशोक गांगड व सुरेखा ठाणगे यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शैक्षणिक प्रगती, दैनंदिन उपस्थिती, मुलींची सुरक्षा व आरोग्य या विषयांवर मार्गदर्शन केले.

पालक प्रतिनिधी म्हणून दिपाली झावरे,सुवर्णा कडुसकर,शेलार व श्रीम. घोलप यांनी मनोगत व्यक्त करत विद्यालयाच्या कामकाजाचे कौतुक केले व पाल्यांची काळजी कशी घ्यावी याबाबत विचार मांडले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक व अध्यक्ष निवड कल्पना जाधव यांनी केली. अनुमोदन सुमन वाळुंज यांनी दिले. सूत्रसंचालन सोनल रोहोकले यांनी केले, तर आभार वैशाली गायखे यांनी मानले. विद्यालयाच्या वतीने उपस्थित सर्व महिला पालकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयातील सर्व महिला शिक्षिका व मोठ्या संख्येने महिला पालक उपस्थित होत्या.

# ठाणे जिल्ह्यात २९ सप्टेंबर रोजी भव्य 'रोजगार महाकुंभ'

## ३७ ठिकाणी होणार थेट रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राईव्ह

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, ठाणे :** युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती या संकल्पनेला अनुसरून महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागामार्फत दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी कोकण विभागात एकाच दिवशी आणि एकाच वेळी २३० ठिकाणी भव्य 'रोजगार मेळावे आणि प्लेसमेंट ड्राईव्ह' आयोजित करण्यात आले आहेत. या राज्यव्यापी मोहिमेचा एक भाग म्हणून, ठाणे जिल्ह्यात एकूण ३७ प्रमुख केंद्रांवर सकाळी १०.०० वाजता या 'रोजगार महाकुंभाचे' भव्य आयोजन करण्यात आले आहे.

या महाकुंभाच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील गरजू, सुशिक्षित बेरोजगार आणि नोकरी इच्छुक तरुणांना नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

ठाणे जिल्ह्यात नियोजित ३७ रोजगार मेळाव्यांची केंद्रे खालीलप्रमाणे आहेत:

१) ठाणे बेलापूर इंडस्ट्रीयल असोसिएशन, ठाणे बेलापूर हायवे, रबाळे, नवी मुंबई. २) तकीया अमानी शहा, प्रा. आयटीआय, ६५४ ईदगाह रोड, भिवंडी. ३) लाईट हाऊस कम्युनिटी फाऊंडेशन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, ठाणे. ४) शिवानंद मित्र सामाजिक संस्था, साकेत कॉलेज, साकेत विद्यानगरी मार्ग, चिंचपाडा रोड, काटेमानिवली, कल्याण. ५) पाताली शिव मंदिर संस्था, एनसीटी कॉन्व्हेंट स्कूल मुख्य रस्ता, उल्हासनगर क्र. ४. ६) बाळासाहेब म्हात्रे तंत्रशिक्षण कॉलेज, कान्व्होर, पश्चिम बदलापूर. ७) शासकीय तंत्रनिकेतन कॉलेज, फडकेपाडा, पो. ढवळे, मुंब्रा, ठाणे. ८) तेलगू समाज शिक्षण संस्था, मनपा पाण्याच्या टाकीजवळ, फेनेगाव, कामतघर, भिवंडी, ठाणे. ९) कोटी विद्या चॅरिटेबल ट्रस्ट अलमपुरी रत्नमाला संस्था, ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, ए. एस. राव नगर, सापगाव, ता. शहापूर, जि. ठाणे. १०) शिवाजीराव एस. जोधळे पॉलिटेक्निक, गुरुद्वारानजीक, मुंबई-नाशिक हायवे, आसनगाव, ता. शहापूर, जि. ठाणे. ११) आत्मा मालिक संस्था ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, अघई, पो. मोहीली, वाडा तानसा रोड, ता. शहापूर, जि. ठाणे. १२) रतन टाटा महाराष्ट्र राज्य स्किल विद्यापीठ, कोपरी इंडस्ट्रीयल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, साधू वासवानी नगर, कोपरी, ठाणे पूर्व. १३) विद्याप्रसारक मंडळ किन्हवली संचालित अरविंद (आप्पासाहेब) भानुशाली, मु.पो. किन्हवली, ता. शहापूर, जिल्हा ठाणे. १४) संस्कार प्रतिष्ठान, चाचा नेहरू स्कूल, छत्रपती शिवाजी महाराज चौक जवळ, भिवंडी. १५) श्री. स्वामी समर्थ सेवा केंद्र, रमेशवाडी, बदलापूर पश्चिम, ठाणे. १६) वीर चक्र बिशोई शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुरबाड. १७) बी. के. बिर्ला कला व विज्ञान महाविद्यालय, कल्याण. १८) अचिव्हर्स कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स महाविद्यालय, कल्याण. १९) मेहता डिग्री कॉलेज, ऐरोली. २०) तेरणा वैद्यकीय महाविद्यालय, नेरूळ, नवी मुंबई. २१) कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, वाशी. २२) शंकर नारायण कला व वाणिज्य महाविद्यालय, भाईंदर, ठाणे. २३) विद्या प्रसारक मंडळ अभियांत्रिकी महाविद्यालय, ठाणे. २४) बी. एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे. २५) पी. डी. कारखानीस कला व वाणिज्य महाविद्यालय, अंबरनाथ. २६) लोकमान्य टिळक अभियांत्रिकी महाविद्यालय, कोपरखैरणे. २७) एस. के. विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नेरुळ. २८) प्रतीक पाटील महाविद्यालय, मीरा रोड. २९) साईनाथ एज्युकेशन ट्रस्टचे राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशी. ३०) तेरणा अभियांत्रिकी कॉलेज, नेरूळ. ३१) विद्या प्रसारक मंडळ के. जी. जोशी कॉलेज ऑफ आर्ट्स, एन. जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स, ठाणे. ३२) इंदिरा गांधी अभियांत्रिकी कॉलेज, घणसोली. ३३) छत्रपती शिक्षण संस्था ए. सी. सायन्स कॉलेज, पडघा, ता. भिवंडी. ३४) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बेलापूर, नवी मुंबई. ३५) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वागळे इस्टेट, ठाणे, जि. ठाणे. ३६) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उल्हासनगर, जि. ठाणे. ३७ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबरनाथ, जि. ठाणे.

सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे रविन्द्र मोरे यांनी जिल्ह्यातील सर्व खाजगी क्षेत्रातील उद्योजक आणि जास्तीत जास्त नोकरीइच्छुक तरुणांना वरील ठरित ठिकाणी या महामेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# जिल्हाधिकारी व सीईओकडून जिवती तालुक्यात आरोग्य, शिक्षण व कामांची पाहणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** जिल्हाधिकारी वसुमना पंत व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी जिवती तालुक्याचा दौरा करुन आरोग्य, शिक्षण, ग्रामविकास तसेच आकांक्षित तालुका कार्यक्रमाअंतर्गत सुरु असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. विशेष म्हणजे यावेळी त्यांनी प्रत्यक्ष भेटीद्वारे माता सखींसोबत संवाद साधला व शाळाबाहय विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांना मार्गदर्शन केले. दौऱ्याच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी पंत व मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, शेणगाव येथे भेट देऊन, 'माता सखी' कार्यक्रमाचा आढावा घेतला. प्राथमिक आरोग्य केंद्रातील विविध विभागांची पाहणी करुन उपलब्ध आरोग्य सुविधा व सेवांची माहिती घेतली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी माता सखींसोबत संवाद साधून त्यांच्या कामकाजाची माहिती जाणून घेतली तसेच माता व बाल आरोग्याच्या दृष्टीने प्रभावीपणे काम करण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर शेणगाव ग्रामपंचायत क्षेत्रातील दोन शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी व त्यांच्या पालकांशी संवाद साधला. विद्यार्थी शाळेत न जाण्यामागील कारणे जाणून घेत पालकांना मुलांच्या नियमित शिक्षणाचे महत्व समजावून सांगितले. शाळाबाह्य विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, त्यांच्या पालकांशी सातत्याने संपर्क ठेवावा आणि एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना संबंधित शिक्षकांना देण्यात आल्या. शेणगाव येथे निर्माणाधीन सुसज्ज वाचनालयालाही जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी भेट दिली. तसेच जिल्हा परिषद मॉडेल स्कूलच्या इमारतीची पाहणी करुन उपलब्ध सुविधा व सुरु असलेल्या कामांची माहिती घेतली. यानंतर टाटा मोटर्सच्या सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत दत्तक घेण्यात आलेल्या पाच ग्रामपंचायतीपैकी लांबोरी ग्रामपंचायतीला भेट देण्यात आली. येथे आयोजित आरोग्य शिबिराची पाहणी करुन राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. लांबोरी येथील आरोग्य उपकेंद्रालाही भेट देऊन उपलब्ध आरोग्य सुविधा तसेच स्थानिक स्तरावरील समस्या त्यांनी जाणून घेतल्या. दौऱ्याच्या शेवटी पंचायत समिती, जिवती येथे आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत विविध निर्देशांकांवर सुरु असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. आरोग्य, शिक्षण व ग्रामविकासाशी संबंधिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करुन नागरिकांना शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. यावेळी राजुराचे उपविभागीय अधिकारी रवींद्र माने, जिवतीच्या तहसीलदार रुपाली मोगरकर, गटविकास अधिकारी लक्ष्मीनारायण दोडके, यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# चंद्रपूरकरांच्या भक्तीला आ.सुधीर मुनगंटीवार यांची सलामी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषाने संपूर्ण शहर भक्तिमय झाले. ढोल-ताशांचा गजर,देखावे, गणेशभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग आणि बाप्पाच्या निरोपावेळी दाटून आलेले भावनिक क्षण यामुळे गणेश विसर्जन सोहळ्याला भक्ती आणि उत्साहाचे अनोखे वैभव लाभले. हजारो गणेशभक्तांनी शांततेत आणि शिस्तीत आपल्या लाडक्या बाप्पाला श्रद्धापूर्वक निरोप दिला. चंद्रपूरचा गणेश विसर्जन सोहळा हा भक्ती, शिस्त आणि सामाजिक एकतेचा सुंदर आविष्कार ठरला, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

विसर्जन सोहळ्याच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल त्यांनी चंद्रपूर महानगरपालिका प्रशासन, पोलिस दल, गणेश मंडळे, कार्यकर्ते आणि चंद्रपूरकर नागरिकांचे विशेष कौतुक केले. चंद्रपूर शहरातील भव्य गणेश विसर्जन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. हजारो भाविकांच्या उपस्थितीत झालेल्या विसर्जन मिरवणुकीत आ. सुधीर मुनगंटीवार सहभागी झाले. विविध गणेश मंडळांना भेट देत त्यांनी गणेशभक्तांशी संवाद साधला, त्यांना शुभेच्छा दिल्या. बाप्पाच्या चरणी नतमस्तक होत सर्वांच्या सुख, समाधान आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली. शहराच्या विविध भागांतून उमटणाऱ्या 'गणपती बाप्पा मोरया' च्या जयघोषाने वातावरणात भक्तीचा उत्साह संचारला.गणेश भक्तांनी अत्यंत शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. विविध गणेश मंडळांनी साकारलेले आकर्षक देखावे,मल्लखांबाचे थरारक प्रात्यक्षिक, आकर्षक ढोल-ताशांचा निनाद आणि भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे विसर्जन सोहळ्याला विशेष रंगत आली. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषात निरोपाची हुरहूर आणि पुढील वर्षी पुन्हा बाप्पाच्या स्वागताची आस एकवटली होती. डोळ्यांत विरहाचे अश्रू, मनात भक्तीचा भाव आणि ओठांवर बाप्पाचा जयघोष, अशा भावस्पर्शी वातावरणात हजारो भाविकांनी गणरायाला निरोप दिला.

यावेळी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या समवेत भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, चंद्रपूरच्या महापौर संगीता खांडेकर ,डॉ. मंगेश गुलवाडे, ब्रिजभूषण पाजारे, राम लाखिया, सय्यद चांद पाशा, प्रकाश धारणे, पुरुषोत्तम सहारे, रवी लोणकर,




जयश्री जुमडे, छबुताई वैरागडे, नम्रता ठेमस्कर, सविता सरकार, सुनीता जयस्वाल, शिला चव्हाण,चंद्रकला सोयाम, कल्पना बगुलकर, रेणू घोडेस्वार, सुप्रिया सरकार, वंदना संतोषवार, माया उईके, शितल आत्राम, संगीता बावणे, मोनिशा महातव, मनीषा ठुणेकर, काशिनाथ सिंह, रवीश सिंह, श्रीनिवास जंगम, अजय सरकार, अनिल डोंगरे, प्रलय सरकार, महेंद्र जुमळे, आकाश मस्के, विकी लाडसे, सूर्यकांत कुचनवार, सोहम बुटले, प्रमोद शिरसागर, सत्यम गाणार, श्रीनिवास कंदकुरी, होमेश्वर नंदनवार, बाळू कोलनकर,प्रवीण बर्डे, अनिल अडूर, सचिन यामावार, मोनीश आस्वानी तसेच भारतीय जनता पार्टी चंद्रपूर शहर व ग्रामीणचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने विसर्जन सोहळ्यात सहभागी झाले.

आमदार मुनगंटीवार यांनी विविध गणेश मंडळांना भेट देऊन मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. गणेशोत्सवाच्या काळात मंडळांनी राबविलेल्या विविध उपक्रमांचे तसेच विसर्जन सोहळ्याच्या उत्कृष्ट नियोजनाचे त्यांनी कौतुक केले. शांतता, शिस्त आणि सामाजिक सलोखा राखत उत्सव साजरा केल्याबद्दल त्यांनी नागरिकांचे अभिनंदन केले. या पार्श्वभूमीवर आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर महानगरपालिका, पोलिस प्रशासन, गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्व गणेशभक्तांचे अभिनंदन करताना सांगितले की, गणरायाला निरोप देताना ही चंद्रपूरकरांनी भक्ती बरोबर शिस्त, संयम आणि सामाजिक बांधिलकीची परंपरा जपली. प्रशासन, गणेश मंडळे, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या समन्वयातून पार पडलेला हा विसर्जन सोहळा चंद्रपूरच्या सांस्कृतिक समृद्धी, सामाजिक एकता आणि भक्तीभावाचे दर्शन घडवणारा ठरला आहे.

# कृषी विज्ञान केंद्र सिंदेवाही येथे नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रमाचा उत्साहात समारोप

अक्षराज : नितेश पाटील

**दि.२७, चिमूर :** कृषी विज्ञान केंद्र, सिंदेवाही, चंद्रपूर यांच्या वतीने दि.२२ ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे मार्गदर्शन डॉ. सोनाली एन. लोखंडे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रम समन्वयक म्हणून डॉ. वर्षा जगदाळे यांनी जबाबदारी सांभाळली.




प्रशिक्षणामध्येशी. प्रवीण देशपांडे, शास्त्रज्ञ,पीक संरक्षण यांनी पिकांमधील कीड व रोग याचे नियंत्रण नैसर्गिक निविष्ठा वापरून कसे करावे याचे मार्गदर्शन केले. तसेच श्री डी व्ही ताथोड शास्त्रज्ञ,कृषी अभियांत्रिकी यांनी नैसर्गिक शेतीमध्ये वापरण्यात येणाऱ्या अवजारांबद्दल माहिती दिली. डॉक्टर सोनाली लोखंडे शास्त्रज्ञ यांनी नैसर्गिक निविष्ठांचे मार्केटिंग ब्रॅण्डिंग आणि पॅकेजिंग विषयावर सखोल मार्गदर्शन केले. डॉ.वर्षाजगदाळे शास्त्रज्ञ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र यांनी नैसर्गिक शेतीमधील विविध निविष्ठा तयार करणायचे प्रात्यक्षिक घेतले.

प्रशिक्षणादरम्यान जीवामृत, घनजीवामृत, बीजामृत यांसारख्या नैसर्गिक निविष्ठांची निर्मिती व वापर याबाबत प्रात्यक्षिकांद्वारे माहिती देण्यात आली. प्रशिक्षणार्थींनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

दि. २६ सप्टेंबर रोजी प्रशिक्षणाचा समारोप करण्यात आला. समारोप प्रसंगी प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त केला. नैसर्गिक शेतीचा प्रसार करण्यासाठी कृषी सखींची भूमिका महत्त्वाची असल्याचे यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल सहभागी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा देण्यात आल्या. प्रशिक्षणार्थींनी कृषी विज्ञान केंद्राचे आभार मानत प्रशिक्षणाबद्दल समाधान व्यक्त केले.

# दुष्काळी परिस्थितीत राज्य शासन मराठवाड्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे - परिवहन मंत्री सरनाईक

अक्षराज : घनश्याम आंबोकर

**दि.२७, ठाणे :** राज्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता शासनाने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थती जाहिर केली आहे. दुष्काळी परिस्थितीमध्ये राज्य शासन मराठवाड्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे प्रतिपादन राज्याचे परिवहन मंत्री तथा पालकमंत्री धाराशिव प्रताप सरनाईक यांनी आज मराठवाडा जनविकास परिषद, ठाणे यांच्या वतीने गडकरी रंगायतन येथे 'मराठवाडा मुक्ती संग्राम दिन सोहळा' तथा 'मराठवाडा मित्र आणि मराठवाडा रत्न पुरस्कार वितरण सोहळयात केले.

यावेळी खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, पद्मश्री श्रीरंग लाड, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे (डठअ) मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मराठवाडा जन विकास परिषदेचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे, 'लोकमत'चे संपादक अतुल कुलकर्णी, डॉ.मुकुंद अडसूळ, डॉ.मंगेश कराड, जेष्ठ पत्रकार दिलीप सपाटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी 'मराठवाडा मित्र पुरस्काराने' सन्मानित झाल्यानंतर मनोगत व्यक्त करताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, आपण आतापर्यंत प्रामुख्याने धाराशिव जिल्ह्यामध्ये विकास व सेवाकार्यासाठी प्रयत्न केले आहेत. मात्र, या पुरस्कारामुळे संपूर्ण मराठवाड्याच्या दुष्काळी परिस्थितीतही धाराशिवच्याच धर्तीवर प्रभावी काम करण्याची आपली जबाबदारी आता आणखी वाढली असून, ती आपण पूर्ण निष्ठेने पार पाडू. सध्या मराठवाड्यात आणि विशेषतः धाराशिव जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची व चाऱ्याची तीव्र समस्या निर्माण झाली असून पाणीसाठा केवळ ८ टक्क्यांवर आला आहे. दुष्काळग्रस्त भागामध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा, चारा छावण्यांची उभारणी आणि शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी राज्य शासनातर्फे सर्वतोपरी सहकार्य केले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मराठवाडा जन विकास परिषद ठाणे यांच्या वतीने राज्यातील दृष्काळग्रस्त भागासाठी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ५ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. हा धनादेश कॅबिनेट बैठकीमध्ये मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्द करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.ठाण्यात मराठवाड्यातून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हक्काचे वसतिगृह उभारण्याच्या मुद्यावर बोलताना, यासाठी ठाणे महानगरपालिका क्षेत्रात, प्रामुख्याने घोडबंदर भागात योग्य तो भूखंड उपलब्ध करून देण्यासाठी आणि पाठपुरावा करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन नेत्यांनी दिले.

यावेळी खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर व पुरस्कार प्राप्त मान्यवर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच मान्यवरांच्या हस्ते पद्मश्री श्रीरंग लाड, लोकमतचे संपादक अतुल कुलकर्णी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे (SRA) मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, डॉ.मंगेश कराड, डॉ.मुकुंद अडसूळ यांना मराठवाडा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठवाडा जन विकास परिषदेचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांनी केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'मराठवाडा बहुजन बुलेटिन' या विशेष अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# 'स्वस्तिक पॅटर्न' वृक्षलागवडीतून पर्यावरण संवर्धनासह ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढणार : जिल्हाधिकारी पंत

अक्षराज : वसंत वडस्कर

**दि.२७, चंद्रपूर :** 'स्वस्तिक पॅटर्न' वृक्षलागवडीमुळे कमी जागेत अधिक झाडांची लागवड करुन पाण्याची बचत, हरित क्षेत्रात वाढ आणि पर्यावरण संवर्धन साधता येणार आहे. त्यासोबतच केशर आंबा फळबागांच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना भविष्यात स्वत:चे उत्पन्न मिळण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी केले.

विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी अभीयान (व्ही- बी-जी राम- जी), ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र व विव्ध योजनांच्या अभिसरणातून सिदेवाही येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रात २५ सप्टेंबर रोजी 'स्वस्तिक पॅटर्न वृक्षारोपण' प्रात्यक्षिक कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. ए. एस. नाथन (ऑक्सिजन मॅन) यांच्या संकल्पनेवर आधारित 'स्वस्तिक पॅटर्न वृक्षारोपण' कार्यक्रमात जिल्हाधिकारी वसुमना पंत आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करुन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. स्वस्तिक पॅटर्नच्या प्रात्यक्षकाची पाहणी करुन त्या म्हणाल्या, सिंदेवाही येथील ग्रामसेवक प्रशिक्षणन केंद्रात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया जिल्हयांतील ग्राम पंचायत अधिकारी, विस्तार अधिकारी व सरपंचाचे नियमित प्रशिक्षण होते. त्यामुळे चारही जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थींना स्वस्तिक पॅटर्न वृक्षलागवडीची प्रत्यक्ष माहिती मिळावी आणि या अभिनव पध्दतीचा व्यापक प्रचार- प्रसार व्हावा, यासाठी या केंद्राची ' डेमो साईट' म्हणून निवड करण्यात आली आहे.

स्वस्तिक पॅटर्नमुळे कमी जागेत अधिक झाडे लावणे, पाण्याची बचत व संवर्धन तसेच हरित क्षेत्र वाढविण्यास मदत होणार आहे. केशर आंबा फळबाग लागवडीमुळे गिरामुंचायतींना भविष्यात उत्पन्नाचा अतिरिक्त स्त्रोतही निर्माण होऊ शकेल, असे जिल्हाधिकारी पंत यांनी सांगितले. जिल्ह्यातील ८२५ ग्रामपंचायतीमध्ये वृक्षलागवड करण्याचे नियोजन आहे. ग्राम



पंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात, यासाठी केशर वाणाच्या आंब्याची लागवड करण्यात येत आहे. फळबागा उत्पादनात आल्यानंतर फळांच्या विक्रीतून ग्राम पंचायतींना स्वत:चे उत्पन्न अर्थात प्राप्त होऊ शकतो.

या उत्पन्नाचा उपयोग गावातील रस्ते, पथदिवे, पाणीपुरवठा, शाळा व इतर विकासकामांसाठी करता येईल. गावांना सुंदर, हिरवेगार आणि आर्थिकदृष्ट्या समृध्द बनविण्याचा संकल्प करु या, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी केले.

जिल्हास्तरीय प्रात्यक्षिकानंतर पुढील महिन्यात खनिज क्षेत्र बाधित ५० ग्राम पंचायतीमध्ये स्वस्तिक पॅटर्न वृक्षलागवड, तर अन्य ५० ग्रामपंचायतीमध्ये केशर आंबा लागवड प्रायोगित तत्वावर करण्याचे नियोजन आहे. या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासोबत पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्रवाढ आणि शाश्वत विकासाला चालना देण्याचा उद्देश असल्याचे जिल्हाधिकारी पंत यांनी स्पष्ट केले.

# जरंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात औषध निर्माण अधिकारी गैरहजर

अक्षराज : पूनम परदेशी

**दि.२७, जरंडी :** तालुक्यातील जरंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात औषध निर्माण अधिकारी गैरहजर असल्याने शनिवारी उपचारासाठी आलेल्या रुग्णांना बाह्यरुग्ण विभागात औषध उपचार न मिळाल्याने संतप्त महिला व ग्रामस्थांनी वैद्यकीय अधिकारी यांना जाब विचारला परंतु आरोग्य विभागाने समाधान कारक उत्तरे न दिल्याने संतप्त महिला व ग्रामस्थांनी ता. ६ ऑक्टोबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्राला कुलूप ठोकण्यात येईल असा लेखी इशारा शनिवारी (ता.२७) वैद्यकीय अधिकारी डॉ मोनम ढवळे यांना दिला आहे

जरंडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हा औषध पुरवठा विभागातील उषा डवणे यांची एप्रिलमध्ये जरंडी येथे बदली झालेली आहे परंतु या औषध निर्माण अधिकारी चार महिन्यात केवळ तीन ते चार दिवसच हजर झालेल्या असून आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेवकाकडे त्यांनी रुग्णांना औषधी देण्याचे काम सोपविले असल्याचे प्रकार शनिवारी



उघड झाला त्यामुळे गावातील संतप्त महिला व ग्रामस्थांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात येऊन वैद्यकीय अधिकारी यांना जाब विचारला परंतु त्यांनी मी नव्याने च रूजू झाली आहे.

त्यामुळे याबाबत अद्याप कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी व कृती नागरी समितीचे स्वप्नील बिरारे, योगेश चव्हाण, रविंद्र गायकवाड, भगवान चौधरी यांच्या नेतृत्वाखाली (ता.०६) ऑक्टोबर रोजी आरोग्य केंद्रात कुलूप ठोकण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे वैद्यकीय अधिकारी डॉ.मोनम ढवळे यांना निवेदन दिले आहे.

निवेदनावर माजी ग्रामपंचायत सदस्य वैशाली गवले, शांताबाई अंभोरे, वैशाली देवरे, वाल्मिकी चव्हाण, योगेश चव्हाण, राहुल जाधव, स्वप्नील बिरारे, संजय गोरे, अनिल राठोड, भगवान चौधरी, आदींसह ग्रामस्थांनी स्वाक्षरी आहे.

## थोडक्यात बातम्या

# कबड्डी स्पर्धेत समर्थ माध्यमिक विद्यालय तरनळीचा संघ तालुक्यात प्रथम



अक्षराज : शिवाजी औसेकर

**दि.२७, केज :** क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयामार्फत आयोजित शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.तालुका स्तरीय कबड्डी १७ वर्ष वयोगटातील 'समर्थ माध्यमिक विद्यालय तरनळी' मुलीच्या संघाने नेत्रदीपक कामगिरी केली. दिनांक२६/९/२०२६ रोजी आयोजित तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धेत १७ वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत जिल्हा स्तरावर प्रवेश मिळवला तसेच १४ वर्ष वयोगट मुले १०० मी धावणे व लांब उड्डी स्पर्धेत चि. सारूक रितेश विनोद याने प्रथम बाजी मारत जिल्हा स्तरावर प्रवेश मिळवला. तसेच १७ वर्ष वयोगट मुली लांब उड्डी स्पर्धेत कु.मोहिते पल्लवी प्रदिप प्रथम क्रमांक व कु.देटे प्रियांका अशोक दुतीय क्रमांक वर बाजी मारत जिल्हा स्तरावर प्रवेश मिळवला.

त्याचप्रमाणे १७ वर्ष वयोगट ४०० मी धावणे स्पर्धेत कु. देटे प्रियांका अशोक प्रथम क्रमांक व कु.देटे सोनाली भास्कर दूतिय क्रमांक मिळवत जिल्हा स्तरावर प्रवेश मिळवला. या सर्व यशाबद्दल बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे साहेब यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्या दिल्या. संस्थेच्या अध्यक्षा सारिका ताई सोनवणे, संस्थेचे सचिव अ‍ॅड.कांदे, तालुका क्रीडा अधिकारी राखी मॅडम, गटशिक्षणाधिकारी साहेब, मुख्याध्यापक कुलकर्णी सर, क्रीडा शिक्षक जोगदंड सर, व तसेच सोनवणे सर, श्रीमती काळे मॅडम, धायगुडे सर, डाके सर, थळकरी सर, काकडे सर, तरकसे मॅडम, अंजान सर, श्री सरवदे, श्री मंदे, श्री सुरवसे तसेच गावातील पालक व प्रतिष्ठित नागरिक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# नॉर्थ युरोप मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी महाराष्ट्रातून डॉ.निलेश राणे यांची निवड



अक्षराज : प्रतिनिधी

**दि.२७, नाशिक :** ट्युनिस देशातील गॅमर्थ शहरातील वेर्डी ट्युनिस बीच रिसॉर्ट येथे वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स (लंडन) यांच्या वतीने ऑक्टोबर महिन्यात आयोजित करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी महाराष्ट्रातून नाशिकचे डॉ.निलेश राणे यांची निवड करण्यात आली असून, त्यांना विशेष निमंत्रण देण्यात आले आहे.

या परिषदेत युरोप, आफ्रिका आणि आशिया खंडातील प्रतिष्ठित व्यक्ती, विविध देशांचे शिष्टमंडळे तसेच विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. जागतिक स्तरावरील संबंध व सहकार्य अधिक दृढ करणे, नाविन्यपूर्ण कल्पनांची देवाणघेवाण, जागतिक नेतृत्व, मानवतेचा विकास आणि आंतरराष्ट्रीय व्यावसायिक भागीदारी यावर परिषदेत विचारमंथन होणार आहे.

तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जागतिक व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातून डॉ.निलेश राणे यांची झालेली निवड ही राज्यासाठी गौरवाची बाब मानली जात असून, त्यांच्या या आंतरराष्ट्रीय सहभागाबद्दल विविध क्षेत्रांतून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

# राळेगणसिद्धी गावाचा देखणा देखावा !

## बाळू पठारे यांच्या घरातील गणरायासमोर साकारली आदर्श गावाची प्रतिकृती




अक्षराज : विठ्ठल निकाळजे

**दि.२७, कोथरूड :** गणेशोत्सवाच्या निमित्ताने बाळू पठारे यांच्या घरातील गणरायासमोर यंदा सामाजिक संदेश देणारा आकर्षक देखावा साकारण्यात आला आहे. या देखाव्यात अण्णा हजारे यांचे राळेगणसिद्धी गाव हुबेहूब पद्धतीने रेखाटण्यात आले असून, या गावाची ओळख असलेली आदर्श ग्रामविकासाची संकल्पना देखाव्याच्या माध्यमातून मांडण्यात आली आहे.

राळेगणसिद्धी हे अहमदनगर जिल्ह्यातील आणि सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्या कार्यामुळे देशभर परिचित झालेले गाव आहे. जलसंधारण, वृक्षसंवर्धन, ग्रामविकास आणि सामाजिक सहभागाच्या माध्यमातून गावाने आदर्श ग्रामविकासाचा एक वेगळा नमुना निर्माण केला आहे. बाळू पठारे यांच्या घरातील गणपतीसमोर साकारलेल्या या देखाव्यात राळेगणसिद्धी गावातील विविध वैशिष्ट्ये अतिशय बारकाईने दाखविण्यात आली आहेत. गावातील वातावरण, रस्ते, घरे, हिरवाई तसेच ग्रामविकासाची संकल्पना कलात्मक पद्धतीने मांडण्यात आली आहे.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक संदेश देणारा उत्सव व्हावा, या उद्देशाने हा देखावा साकारण्यात आल्याचे सांगण्यात आले. देखावा पाहण्यासाठी परिसरातील नागरिक व गणेशभक्त मोठ्या उत्सुकतेने भेट देत असून, बाळू पठारे यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.